# "दादा लाड तंत्रज्ञान अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न"

शिंदखेडा तालुक्यातील पिलखेडा येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत असलेले कृषी विज्ञान केंद्र, धुळे व ग्रामविकास गतिविधि, जिल्हा धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०३/१२/२०२३ रोजी दादा लाड कापूस तंत्रज्ञानावर मार्गदर्शनासाठी शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

धुळे जिल्ह्यामध्ये दादा लाड तंत्रज्ञानाचे(कॅनोपी मॅनेजमेंट) प्रात्यक्षिते प्रायोगिक तत्त्वावर राबवली जात आहेत. सदर प्रात्यक्षिकांमध्ये धुळे जिल्ह्यातील ५० शेतकरी सहभागी झाले असून सदर तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने मौजे पिलखेडा तालुका शिंदखेडा येथे एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. शेतकरी प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. दादासाहेब लाड होते. अध्यक्ष स्थानावरून बोलताना दादासाहेबांनी दादा लाड तंत्रज्ञानातील प्रमुख तंत्र शेतकऱ्यांना समजावून सांगितले, यामध्ये कपाशीची लागवड ९० सेमी. X 30 सेमी. अंतरावर केल्याने झाडांची एकरी संख्या १४८१४ इतकी राहत असल्याने शिवाय ४५ दिवसांच्या आत झाडाची गळ फांदी काढल्याने फळ फांदीला जास्त बोंडे लागून उत्पादनात वाढ होते. त्याबरोबर ८५ ते ९० दिवस किंवा कापूस कमरे एवढा झाल्यावर कपाशीचा मुख्य शेंडा खुडल्याने कपाशीचे बोंडे भरण्यास व तसेच बोंडातील कापसाचे वजन वाढण्यास मदत होते. गळ फांद्या काढल्याने झाडांमध्ये हवा खेळती राहिल्याने कीड व रोगांचे प्रमाण देखील कमी राहते. एकंदरीत दादा लाड तंत्रज्ञानाने (कॅनोपी मॅनेजमेंट) उत्पादनात वाढ होऊन उत्पादनाचा खर्च देखील कमी होतो या तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांना एकरी २० क्वि. कापूस मिळत आहे, असे प्रतिपादन श्री.दादासाहेब लाड यांनी केले.

मा. श्री. जगदीश काथेपुरी शास्त्रज्ञ कृ. वि. कें. धुळे यांनी दादा लाड तंत्रज्ञानाने कपाशीचे लागवड याविषयी मार्गदर्शन केले. शेतकरी बंधूंनी माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन करावे तसेच रासायनिक कीटकनाशकांऐवजी जैविक कीटकनाशके, बुरशीनाशके, उदा. ट्रायकोडर्मा, व्हर्टिसिलियम, मॅटरिझम ई. जैविक निविष्ठांचा वापर करावा त्यामुळे परिसंस्था संतुलित राहून पर्यावरणाचे रक्षण होणार आहे, असे आवाहन केले.

मा. श्री. भालचंद्र कानडे यांनी विषमुक्त शेती व सेंद्रिय शेती याविषयी सखोल मार्गदर्शन केले. सेंद्रिय शेती ही काळाची गरज ठरल्याने भविष्यात शेती जिवंत ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी विषमुक्त शेतीचा अवलंब करावा असे आवाहन केले. मा. श्री. संजय चौधरी यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तसेच गुरु गोरक्षनाथ आखाडा प्रमुख मा. श्री. दत्तनाथजी योगी (महाराज) यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुणाल राजळे, जीवन राणे, श्री. दत्तनाथजी योगी (महाराज), . श्री. धीरज धनगर, श्री. पुंडलिक चित्ते, श्री. उमेशजी देशमुख, श्री. दुल्लभ जाधव, श्री. उत्तम तावडे, श्री. हरपाल गिरासे, श्री. शिवप्रसाद शेवाळे आदींनी प्रयत्न केल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी शेतकरी शेतकऱ्यांसहित भारतीय किसान संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते देखील उपस्थित होते.



मा. श्री. दादासाहेब लाड ,  दादा लाड तंत्रज्ञानातील प्रमुख तंत्र शेतकऱ्यांना समजावून सांगतांना




मा. श्री. जगदीश काथेपुरी शास्त्रज्ञ कृ. वि. कें. धुळे यांनी दादा लाड तंत्रज्ञानाने कपाशीचे लागवड याविषयी मार्गदर्शन करतांना